ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# कथा आणि कथेतील बदलत्या प्रवाहाचा अभ्यास

**प्रा. आशा नत्थुजी काटेखाये**

*अशोक मोहरकर कला व वाणिज्य महाविद्यालय, अडयाळ, जि. भंडारा*

**प्रस्तावना :**

मराठी ललित साहित्याला कविता, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, आत्मचरित्र, चरित्र, विनोद साहित्य इ. वाङ्:मय प्रकाराने समृद्ध केले आहे. त्यात कथा या वाङ्:मय प्रकाराने ललित साहित्याला वेगळया उंचीवर नेले आहे. कथा हा कथनात्मक ललित साहित्याचा एक स्वतंत्र साहित्य प्रकार होय. कथा व कादंबरी हे दोन्हीही कथनात्मक साहित्य प्रकार असले तरी दोघांचे कलातंत्र, प्रकृतीधर्म स्वतंत्र आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जेव्हा एकूणच साहित्य व कला यांच्या भिन्न भिन्न प्रकाराच्या स्वतंत्र स्वरुपाची जाणीव पक्की होऊ लागली. त्याच वेळेस कथेला स्वत:चे कलासंकेत, स्वत:ची संघटनातत्वे आहेत याचे भान होऊ लागले. कथेच्या ठिकाणी संपन्न कलानुभव देण्याची क्षमता आहे. याची जाण समीक्षकांना वेळोवेळी जाणवत होती.

**उद्दिष्टये :—**

- कथा या वाङ्:मय प्रकाराची ओळख, लेखनतंत्र आकृतीबंद समजून घेणे.
- कथा या वाङ्:मय प्रकाराची वाटचाल
- कथेतील बदल्या प्रवाहाची ओळख करते
- कथेतील दलित, ग्रामीण प्रवाह, जीवन जाणीव, संवेदना, समजून घेणे आणि त्यातील सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक स्तर शोधणे.

**गृहितके :—** ग्रामीण व दलित समाजातील जीवन जाणीवा, संवेदना कथा या वाङ्:मय प्रकारात कथा प्रकारे प्रभावीपणे पणे मांडल्या आहेत या गृहितके तत्वाला धरुन विषयाची मांडणी.

**कथेची वैशिष्ट्ये :—** कथेत रचनेचे अनुभवाचे एककेंद्रित्व असते, तर कादंबरी ही अनेक केंद्री असते. कथेच्या एककेंद्री स्वरुपामुळे तिच्या संस्कारात ज्या जातीची एकता येते तशी अर्थातच कादंबरीच्या संस्कारात संभवत नाही. कथेचे लघुरुप व तिच्या संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत काही विशेष स्वभावत:च येतात. एकेंद्रित्व, मितव्यव, संक्षेप, काटेकोरपणा, नेमकेपणा हे कथेच्या कलातंत्राचे खास विशेष म्हणता येईल.

कथा हा गीताप्रमाधेच एक प्राचीन साहित्य प्रकार आहे. कहाणी, लोककथा, परीकथा, नीतीकथा, दैवतकथा इत्याची कथाप्रकार ही आधुनिक लघुकथेची मौखिक परंपरेतील पूर्वरुपे होय. त्यांना आधुनिक कथेचे मूलस्त्रोत म्हणता येईल. कथेचे हे मूलस्त्रोत सर्व समाजात प्राचीन काळापासून आढळत असले तरी आधुनिक कथेला सुमारे दीडेशे वर्षाची परंपरा आहे.

कथेच्या ठिकाणी संपन्न कलानुभव देण्याची क्षमता असते. कादंबरी सारख्या दीर्घ साहित्यप्रकाराला साधता येणार नाही अशी विशिष्ट प्रकाराची कलात्मक संघटना व जीवनदर्शन कथा साधत असते. कथेच्या अनुभवाच्या अंगाने भयकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, फँटसी आदी कथाप्रकार कल्पिता येतात. कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपद्धती व भाषा हे कथेचे मूलघटक होय. त्यांच्या आश्रयाने कथाकार कथानिर्मिती करीत असतो. तो कथेत निवेदकाच्या दृष्टिकोनातून विशिष्ट जीवनार्थ/अनुभव—कथन करीत असतो. निवेदक घटना प्रसंगाचे, पात्राच्या कश्तीचे, वातावरणादी अन्य तपशिलांचे निवेदन करीत असतो. हे निवेदन म्हणजे अर्थातच केवळ गुंफण केलेली असते. या गुंफाणीमागे एखादे विशिष्ट संघटनतत्व अंतर्भूत असते. त्यातूनच कथानकाला विशिष्ट रूप लाभत असते. या कथानकातून कथागत अनुभवार्थ साकारता जातो.

कथानकाला आदी, मध्य व अंत असले तरच त्याला समग्रता प्राप्त होते हा ॲरिस्टॉटलचा शोकात्मिकेतील कथानकासंबंधीचा सिद्धांत कथेतील कथानकाच्या संदर्भातही प्रस्तुत मानण्यात आला आहे.

कथेतील पात्रे ही सामान्यत: प्रत्यक्षातील माणसांच्या अनुकृतीतून निर्माण झालेल्या शब्दरुप प्रतिमा असतात. तथापि, काही वेळा ती तशी नसून विशिष्ट पात्रांच्या मनातील कल्पनेच्या पातळीवर आकारणाऱ्या त्या प्रतिमा असतात. कथा ही एका विशिष्ट

भौगोलिक तसेच सामाजिक, सांकृतिक परिसरात घडत असते. या बरोबरीने कथेतून एखादी भाववृत्तीही प्रकटत असते. या सर्व घटकातून कथेतील 'वातावरण' तयार होत असते. वातावरण हाही कथेचा एक मूलघटक होय.

निवेदन किंवा कथन हे कादंबरी प्रमाणेच कथेचेही एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य होय. कथाकार कथा सांगण्यासाठी एक निवेदक—पात्र निर्माण करतो आणि निवेदक पात्राच्या दृष्टिकोणातून कथाकार आपला कलाहेतु मांडत असतो. या कला हेतूनुसार कथेतील विविध घटकांची विविध घटकांची विशिष्ट रीतीने संघटना करीत असतो.

संवाद हा निवेदनातील एक घटक असता तरी संवादाचे प्रमुख प्रयोजन पात्रानिर्मिती हे होय. पात्राचे व्यक्तिमत्व, त्याचा सामाजिक/सांस्कृतिक स्तर, त्याची विशिष्ट मन:स्थिती, भावस्थिती यांची प्रतीती संवादातून येते. अशाप्रकारे संवादातून प्रत्यक्ष पद्धतीने पात्रचित्रण साधले जाते. कोणत्याही साहित्यप्रकाराप्रमाणे कथेलाही तिचे तंत्र, कलासंकेत असतात. तंत्र म्हणजे अर्थातच कारागिरी किंवा बंदिस्त नियमावली नव्हे. तसेच, तंत्र ही अमूर्त स्वरुपाची, सार्थ ठरणारी गोष्ट होय. प्रत्येक साहित्यप्रकार हा सतत घडत असतो व त्याचबरोबर बदलतही असतो. त्यामुळेच कथा ही कलानिर्मितीच्या उद्दिष्टातून तसेच रंजन, बोध यासारख्या कलाबाह्य हेतूंनी प्रेरित होऊन लिहिल्याचेही दिसते. मात्र महत्वाची गोष्ट ही की एक आव्हान देणारा साहित्यप्रकार म्हणून अव्वल दर्जाच्या साहित्यिकांनी गंभीर, कलापूर्ण निर्मितीसाठी कथेची सातत्याने निवड केलेली आहे. आजही कथा नवनव्या रूपांत आकरताना दिसत आहे.

मराठी लघुकथा 'करमणुकी' पासून म्हणजे १८९० पासून सुरू झाली असे मानल्या जाते. १९९० ते १९२६ हा पहिला कालखंड मराठी कथेच्या संदर्भात मानल्या जातो. ह. ना. आपटे, पि. सी. गुर्जर, श्री. कृ. के. गोखले. नारायण देशपांडे, सुवासिनी, वामनसुता, काशीबाई कानीटकर, सौ. गिरजाबाई वेळुकर शिर्के, श्री. कृ. कोल्हटकर, न. चि. केळकर, वा. म. जोशी इ. कथलेखकंनी मराठी कथेची धुरा या काळात सांभाळली.

१९२६ ते १९४४ या कालखंडात य.गो. जोशी, वि.चि. बोकील, प्रा. अनंत कानेकर, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळे, मामा वरेरकर इत्यादींनी कथलेखन केले. १९९० ते १९२६ या कालखंडास 'मनोरंजन' कालखंड तर १९२६ ते १९४४ या कालखंडात 'यशवंत—किर्लोस्कर' कालखंड असे संबोधल्या जाते. ''१८९० पासूनचा

१९६५ पर्यंतच्या लघुकथांचा लेखाजोखा म.ना. अदवंत यांना ‘प्रदिक्षणा’ त मांडला आहे. यांना मांडलेला आलेख लघुकथेचा प्रवास व्यक्त करणारा आहे. ते म्हणतात, १८९० पासूचा तिचा आलेख जर काढला तर तो वरवरच जात आहे. तिचा उत्कर्ष बिंदू अद्याप खूप उंच आहे. पण ती उत्कर्षाच्या बिंदूकडे झपाटयाने जात आहे. हे निश्चित.

दुसऱ्या महायुद्धानंतर नवकथेला सुरूवात झाली. महायुद्धाने मानवी जीवन होरपळल्या जाऊन बेचिराख झाले. त्याचा परिणात संपूर्ण जगावर झाला सोबत त्याचा परिणाम साहित्यावर होणे क्रमप्राप्त होते. या काळात मानवाच्या शुद्रपणाची जाणीव झाली. याच काळात नव्या जीवनजाणिवांनी कथानिर्मिती होऊ लागली. हीच नवकथा होय. या कथेचे सुत्रधार गंगाधर गाळगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे व व्यंकटेश माडगूळकर होते. ‘‘ या कथाकारांनी आशय स्वरुप व विवेचनाच्या दृष्टिने मराठी कथेला अभिनवता दिली. मराठी कथेला जीवनसन्मुख केले व कलात्मक बनविले.’’ असे डॉ. पैठनकर स्पष्ट करतात. या संदर्भात डॉ. प्रकाश खरात यांच्या मते या कथाकारांची मानसिकता लक्षात आणून देतात. ते म्हणतात, ‘‘मराठी कथेचा ठोस प्रवाह उदयास येतो. मराठी कथाकराची ठोस दृष्टी माणसाचे दु:ख सोडून प्राण्यांचे दु:ख होऊन प्रकटते. नवकथाकार गंगाधर गाळगीळ यांची पहिली कथा ‘‘प्रिया आणि मांजर’’ जुलै १९४० मध्ये वाङ्‌मय शोभेत प्रसिद्ध झाली. अरविंद गोखले यांची पहिली कथा ‘मांजराचे पोर’ या नावे प्रसिद्ध झाली. व्यंकटेश माडगूळकर यांची पहिली कथा ‘काळ्या तोंडाची’ कुत्रीवर लिहिल्या गेली. प्राणी व दलितांच्या दु:खापेक्षा प्राणी व श्रीमंताचे जीवन चित्रणाला साहित्यात महत्व होते. ती कोंडी फोडून दलित कथेत पिळल्या गेलेल्या माणसाला कथाविषय केले. त्यांच्या दु:खाला केंद्रस्थानी आणले.

१९६० च्या आधी दलितेतर लेखकांनी दलित कथा लिहिल्या आहेत. श्री. म.म. माटे यांनी ‘उपेक्षितांचे अंतरंग’ जाणण्याचा प्रयत्न केला. मराठी साहित्यात ‘करमणुक’ कालखंडात ह.ना. आपटे यांची ‘म्हारणीचा कुणबा’, वि.सी. गुर्जुर यांची ‘धोंड्या’, स.न. जोशी यांची ‘अस्पृश्य’ या कथा गावकुसाबाहेरील जीवनाच्या कथा होत्या. पण डॉ. अनिल गजभिये म्हणतात त्याप्रमाणे ‘‘ह्या सर्व कथा दयेपोटी निर्माण झाल्यामुळे त्यात दलित जाणीव सापडणे शक्य नव्हते’’ मराठी कथेतील दलितांचे चित्रण कधीच समर्थपर्ण मांडल्या गेले नाही.

१९६० या काळात मराठी लघुकथेत अनेक स्थित्यंतर आलीत. याला फ्राईडचे मानसशास्त्रही कारणीभूत ठरले. १९५६ या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे धर्मांतर केले त्यांचे प्रतिबिंब मराठी कथेत प्रामुख्याने दलित कथेत प्रकर्षाने पडले. हा काळ नवकथेचा होता 'सत्यकथा' व 'अभिरूची' यात नवकथा प्रसिद्ध होत होत्या या कथेविषयी डॉ. सुखदेव ढाकणे यांनी नोंदलेला अभिप्राय या कथेचे वास्तव रूप मांडणारा आहे. ते म्हणतात, ''फडके—खांडेकर युगातील साचेबद्धता यातून मराठी कथा आली होती, खरी पण त्यानंतर ती मनोविश्लेषणात गुंतूण पडली व तिथेच गुरफटून राहिली.

मराठी साहित्यात श्री. माटे सोडले तर दलितांचे जीवन चित्रण अभावानेच आलेले आहे. समकालीन कथा वाङ्:मय दलित जीवनापासून कोसो दूर होते. मराठी कथेत ग्रामीण व प्रादेशिक कथा लिहिल्या जाऊ लागल्या. ग्रामीण कथेला सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.भा. मिरासदार, आनंद यादव, रा.रं. बोराडे यांनी केले. जी.ए. कुलकर्णी महत्वाचे कथालेखक आहेत. ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. रा.रं. बोराडे यांनी कथेचा घेतलेला वेध लक्षणीस आहे. ते म्हणतात, ''ज्या सामाजिक स्तरातून हे लेखक आले, त्या सामाजीक स्तरातील लोकांच्या वास्तविक जीवनाचे विविध कंगोरे प्रभाविपणे त्यांच्या लेखनात आले आहेत. वास्तव जीवनाचं चित्र श्री. व्यंकटेश माडगूळकरांच्या वाङ्:मयात उमटत असले तरी ज्या प्रकर्षाने व प्रभावीपणे उमटावयास हवे होते तसे ते उमटलेले दिसत नाही. त्यासाठी मराठी साहित्याला दलित समाजात जन्म घेतलेल्या लेखकाची वाट बघावी लागलेली आहे.''

**दलित कथा :—**

'अस्पृश्यतेमुळे होणाऱ्या अन्यायाच्या जाचातून परिवर्तनाकडे' असा प्रवाह दलित कथेचा होतांना दिसतो डॉ. आंबेडकरांनी चालविलेल्या 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' सारख्या साप्ताहिकातून दलित कथा जन्माला आलेली दिसते. १९३३ ते १९५८ या काळात 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' यातून ११५ कथा प्रकाशित झाल्या. तुकाराम अंबादास पुरोहित या दलित कथाकारांची १९३३ साली 'प्रतिज्ञा' ही सनातनी व सुधारवादी यातील अत:संघर्षावर आधारित पहिली कथा प्रकाशित झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुक्तीलढ्यासोबत दलित कथा जन्मास आली. तुकाराम ना. रा. शेंडे, यादव भिकाजी

गांगुर्डे, हि. गो. बन्सोड, बंधु माधव, माधवराव बागल, दौलत गुणाजी जाधव, अप्पा बावीसकर, एस.व्ही. गायकवाड, वा.सी. कांबळे हे या काळातील महत्वाचे कथालेखक आहेत. 'या काळातील मराठी कथेचे स्वरूप पारंपारिक हिंदुत्ववादी, जीवनवादी, कलावादी, मार्क्सवादी, गांधीवादी जाणिवेचे होते. दलित कथेचे स्वरूप मात्र त्यापेक्षा निराळे होते.' डॉ. ढाकणे यांचे हे वर्णन या वेळेसच्या कथेचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे.

मराठी कथेत दलितांचे चित्रण करणारे दलित कथालेखक अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांना डॉ. भालचंद्र फडके दलित कथेचे शिल्पकार मानतात. त्याचप्रमाणे ना.रा. शेंडे, दया पवार, वामन होवाळ, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, अर्जुन डांगळे, अमिताभ व योगेंद्र मेश्राम हेही महत्वाचे दलित कथालेखक आहेत. १९६० नंतर दलित कथेने एक नवे रूप धारण केले. दलित जीवनाच्या वर्णनात्मकतेपेक्षा दलित जीवनातील दाहक वास्तव त्याचे विद्रोही रूप परंपराधिष्ठित जीवमूल्यांचा कठोर विरोध पण त्याच वेळी माणुसकीसाठी संघर्ष करण्याची वृत्ती, बंधु, माधव आणि बाबुराव बागूल यांच्या कथेत आहे. ना.रा. शेंडे यांनी पारंपारीक कथेचेच बोट धरून लेखन केले. दलित कथेच्या जडणघडणीत महत्वाचे कथालेखक शंकरराव खरात हे होत. १९६५ नंतर पूर्ण बदलली. दलितांच्या जीवनाचा सुक्ष्म वेध, अनुभवाची विविधता, उत्कटता, संवेदनशीलता, भावगर्भता इत्यादी गुणांनी युक्त ती पुढे सरकू लागली. ती अधिक बंडखोरी विद्रोही बनली. बाबुराव बागूल 'जेव्हा मी जात चोरली', मरण स्वस्त होत आहे', 'सूड' यातील कथांनी पूर्ण मराठी कथेला श्रीमंत केले आणि खऱ्या अर्थाने मराठी कथेला कळस चढविला.

''बागूल मानवजातीच्या दु:खाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहतात व मानव सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन करतात. त्या त्यांच्या श्रद्धेचा आणि माणसाच्या कर्तृत्वातील त्यांच्या विश्वासाचा प्रत्यय देखील त्यांच्या कथांतून होतो. त्यामुळे लेखक म्हणून त्यांच्या कथात्मक साहित्याला अव्वल दर्जा प्राप्त होतो आणि त्यातून त्यांच्या कथेला वैचारिकतेचे अमूल्य असे बळ प्राप्त होते व त्यातून बागूलांचा एक क्रांतिकारी नवविचारी समोर उभे राहिल्याने केवळ दलित कथेचीच नव्हे तर मराठी कथा साहित्याची उंची वाढविणारी बाबुलांची कथा ठरते. हे कोणालाही कबूल करावे लागेल.'' असे बागुलांचे कथेतील मोठेपण डॉ. नाझरेथमिस्टिका यांनी मान्य केलेले आहे.

'आम्ही ही माणसं आहोत—, 'पेटलेले आकाश' बंधु माधव यांच्या कथा दलित कथेतील दलितांचे चित्रण समजावून घेण्याचा दृष्टीने बोलके आहे. १९६५ पर्यंतचा दलित कथेचा प्रवास नव्या जीवन जाणिवा मांडणारा आहे. १९४९ पासून अण्णाभाऊनी कथालेखनास सुरुवात केली. 'खुळवाडी', 'नवती', 'गजाआड', ठासलेल्या बंदुका', 'लाडी', 'जिवंत काडतूस', 'फरारी', 'रानवली', 'गुऱ्हाळ', 'चिरानगरातील भूत', 'कृ ष्णाकाळच्या कथा' या कथासंग्रहातून अण्णाभाऊनी उपेक्षित माणसांचे जीवन रेखाटले. त्यांच्या कथेतील पात्रे स्वाभिमानी असून धैर्याने लढा देतात. 'सावली' व 'डोंगरावरील दिवा' या दोन कथासंग्रहातून ना.रा. शेंडे अंधश्रद्धा, देवभोळेपणा याचे दर्शन घडतात. दलित कथेचा प्रारंभकाळ म्हणून त्यांच्या कथांचा निर्देश करता येतो.

डॉ. आबंडेकरांचा सहवास लाभलेले शंकरराव खरात यांचे 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'सांगावा', 'हिवीचा फेरा', 'सुटका', 'दौंडी', 'गावशिव' व आडगावचे पाणी' हे कथासंग्रह आहेत. त्यांनी जीवनाचा खरा अर्थ अलगडून दाखवून सामाजिक जाणिवा प्रगल्भ केल्या आहेत. डॉ. पानतावणे, शंकरराव खरात यांचे नाव कथाकारांच्या रांगेत निश्चित करतात. सुखराम हिवराळे यांनी 'विश्वगेगेच्या काठी' या कथासंग्रहातून ग्रामीण पातळीवरच्या जीवनाचा आरसाच स्पष्ट केला आहे. नवा आशय व अभिव्यक्ती ही वैशिष्ट्य दलित कथेने दिलेले आहे. 'हकिकत आणि जटायू' (दिर्घकथा), 'खरवड', पत्रावळ हे प्र. केशव मेश्राम यांचे कथासंग्रह काव्यात्मक शैलीमुळे, निवेदनाच्या स्वतंत्र ढंगामुळे व नाट्य टिपण्याच्या स्वतंत्र लकबीमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत.

योगिराज वाघमारे यांनी 'उद्रेक', 'बेगड', 'गुडदानी' या कथासंग्रहातून शिक्षित व अशिक्षितांच्या मनोव्यथांचे प्रत्ययकारी चित्रण साकार केले आहे. त्यांनी वर्तमान कथेतून प्रतिबिंबीत केलेले आहे. योगेंद्र मेश्राम यांनी 'रक्ताळलेली लक्तरे' व जगण्याचा प्रश्न' या कथासंग्रहातून दु:ख, दैन्य, गरीबी, बेकारी, गुंडगिरी याचे चित्रण करून बंडखोरीशिवाय पर्याय नसल्याचे सांगतात. अमिताभ यांनी आपला 'पड' या कथासंग्रहातून वेगळे चित्रण केले आहे. 'पड' म्हणजे मृत जनावर, या मृत जनावराच्या मासांसाठी एकमेकाशी झटापटी करणाऱ्याचे हुबेहुब चित्रण 'पड' मध्ये आहे. भूकेसाठीचा 'संघर्ष' हे त्यांचे कथासूत्र आहे.

एकूण दलित लेखकांनी निर्माण केलेली दलित कथा 'मराठी कथा वाङ्:मय प्रवाहाला वेगळया उंचीवर नेऊन ठेवले आहे. माणूसकीचे, मुल्यांचे, नैतिकतेचे अधिष्ठान दलित कथेने मराठी साहित्याला दिलेली अनमोल देणगी आहे.

**ग्रामीण कथा :—**

ग्रामीण कथेची आरंभीचा प्रेरणा ही जीवनातील वास्तववादी अनभूतीतून निर्माण झालेली आहे. १९७० मध्ये खेडयामधून नवशिक्षिताचा फार मोठा वर्ग निर्माण होऊ लागला. दळणवळणाची साधने वाढली शहर जीवनाशी संपर्क वाढला आणि अन्य काही कारणामुळे ग्रामीण जीवन पूर्णतः बदलू लागले. सुधारणेच्या नावाखाली अनेक योजन गोरगरिबांपर्यंत पोहचल्याच नाहीत. विकासाच्या नावाखाली खेडी भकास झाली. अनेक सहकारी संस्था साखर कारखाने ग्रामीण परिसरात जन्माला आली पण त्याच बरोबर शोषितांचा एक वर्ग तयार झाला. सुशिक्षित बेकार वाढले. तरूणांमध्ये असंतोष खदखदत राहिला. या अन्याया विरूद्धची चीड १९७० नंतर ग्रामीण साहित्यात व्यक्त होऊ लागले ग्रामीण वाचक वर्ग वाढला.

आजच्या ग्रामीण कथाविश्वाचा उगम आनंद यादवांच्या मते हरिभाऊ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेत सापडते. १९६० च्या सुमाराला एक नवे युगप्रवर्तन झाले आणि ग्रामीण कथा ही अनेक वेगवेगळया प्रेरणांनी लिहीली जाऊ लागली. आजपर्यंत कमी अधिक फरकाने विस्तारत गेलेली ग्रामीण कथा माडगुळकरांनी विकसित केली. तिला वेगळे परिणाम दिले. ग्रामीणकथेचे खरे रूप माडगूळकरांच्या कथेत सापडते. त्याचबरोबर शंकर पाटील, द. भा. मिरासदार, उद्धव शेळके, आनंद यादव, सखाकलाल, रा. र. बोराडे, बाबा पाटील, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, राजन ठोकळे, सुरेश जाधव, राजन गवस यांनी ग्रामीण कथाविश्व समृद्ध केले.

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेचा रचनाबंद सहजसोपा काळजाला भिडणारा आहे. माडगूळकरांनी अद्‌भतुरम्यतेच्या पातळीवरून कथेला वास्तव पातळीवर आणले. नवकथाकार असल्यामुळे रूढ कथेचे साचे नाकारून मराठी कथेला त्यांनी नवा रूपबंद दिला. माडगूळकरांनी जीवन जाणीव पाटील, कुणगी, माळी या कृषिव्यवस्थेमधील बलुतेदारांत न अडकता गावकुसाबाहेरील भटक्या विमुक्तांच्या भणंग जगण्याचे प्रत्ययकारी चित्रण करते. तर दुसरीकडे ग्रामीण जीवनात होणाऱ्या परिवर्तनचाही ती मागोवा घेते.

एक वेगळाच धुंद करणारा अनुभव ते व्यक्त करतात. ग्रामजीवनातील दु:ख हे तर माडगुळकरांच्या लेखणाने केंद्र आहे.

शंकर पाटील ग्रामीण स्त्रीच्या दु:खाच्या ते समर्थपणे वेध घेता. त्यांच्या कथेतील स्त्री स्वत:साठी जगतच नाही ती कुटुंबासाठी जगते. हालअपेष्ठा भोगते स्वत:च्या सुखाकडे पाठ फिरविते आणि कुटुंबाला आधार देते. 'भुजंग', 'वेणा' या कथा याची साक्ष देते. शंकर पाटील यांनी ग्रामीण कथेला वाङ्:मयीन दृष्ट्या अधिक संस्कारीत केले. त्यात भावपूर्णता व नाट्यमयता आणली. माणसांच्या स्वभावाचे मर्म ओळखून कथा कशी रंगवत न्यायची आणि श्रोत्यावर, वाचकांवरची पकड घट्ट कशी ठेवायची या क्लृप्ती शंकर पाटीलांना अवगत आहे. 'नाटक' ही त्यांची अशीच रंगतदार कथा आहे.

द.मा. मिरासदार यांची कथा विनांदाच्या अंगाने जीवदर्शन घडवते. धूर्त, कावेबाज, चालाख अशी पात्रे त्यांच्या कथांमध्ये आढळतात. त्यांची वाचकास हास्य टिकवून ठेवते. वाचकांचे निखळ मनोरंजन करते. मिरासदारांच्या कथेने मराठी ग्रामीण कथेला विनोदाचे नवे परिमाण मिळवून दिले. या कथाकारांनी ग्रामीण कथेला मराठी कथेच्या मुख्य प्रवाहात मिळविले.कथाकथनाचे कार्यक्रम घेऊन ग्रामीणकथा महाराष्ट्रात दूरदूरपर्यंत पोहचवली. त्यामुळे या कथांना मोठा वाचकवर्ग मिळाला.

सामाजिक वातावरणात आनंद यादवांची पकड असल्यामुळे त्यांच्या कथा सामाजिक वाटतात. ग्रामीण बोलीचा ते लयबद्धतेने व योग्य उपयोग करतात. 'खळाळ', 'मातीखालची माती' हे त्यांचे गाजलेले कथासंग्रह 'उखडेलेल झाडे' या कथासंग्रहात व्यथा वेदनांचे चित्रण येते तर खेडयातील सर्व स्तरात पोहाचलेले राजकारण ते मोठया खुशीने व रंजकतेने मांडतात. १९७० नंतर चळवळ उभी राहीली. ग्रामीण साहित्याची वेगळी साहित्य संम्मेलने होऊ लागली. मेळावे—शिबिरे विचार विनिमय होऊ लागले. यादवांच्या पिढीत ग्रामीण कथा चहू बाजुनी विकसित झाली.

उद्धव शेळके यांच्या कथांमधून वऱ्हाड व विदर्भाचा परिसर साकार झाला. त्यांच्या 'शिळान', 'वानगी' ह्या कथासंग्रहातून त्यांनी चित्र रंगविले आणि वाचकाला अंतर्मुख केले. वऱ्हाडी बोलीचा उत्तम उपयोग केला. त्यामुळेच त्यांची कथा वाचकाच्या मनात घर करते. 'गरीबा घरची लेक' हा कथासंग्रह याच धर्तिवरचा आहे.

रा. र. बोबडे यांनी खेडयातील दैन्य, भूक, उपासमार, बेकारी, शेतकरी यांच्या व्यथा बोराडे आपल्या कथांमधून रंगवतात. ग्रामीण जीवनातील नातेसंबंधाचे वर्णन बोराडे ताकदीने करतात. ‘नातीगोती’, ‘बोळवण’ हे कथासंग्रह उल्लेखनीय आहे. काही बालमनाच्या कथाही रा. र. बोबडे यांनी लिहील्या. राखण, खोप, पोर, लगीन या कथा गरीब शेतमजुरांच्या मुलांच्या कथा आहे. ‘खड्डा’ कथेतून वृद्धांचा व्यथा साकारतात. ‘ताळमेळ’ या कथेत विनोदाला भरपूर वाव दिलेला आहे. त्यांना ग्रामीण वास्तवाची चांगली जाण आहे.

सखा कलालांची कथा मनोविश्लेषनाच्या अंगाने प्रवास करते. कलाल आपल्या कथेत ग्रामीण निसग, ग्रामीण बोली, ग्रामीण परिसर यांचा वापर करतात. त्यांची कथा मुख्यत्वे मानवी कथा आहे.

बाबा पाटील यांनी ग्रामीण व्यक्तीचे वृद्धत्व, त्यांची सश्रध्व मने, त्यांची संभ्रमीत मने बाबा पाटील प्रभावीपणे रंगवतात. ग्रामीण परिसरापेक्षा ते ग्रामीण मनाचा वेध घेतात.

महादेव मोरे यांनी ग्रामीण कथेच्या परिघाबाहेर असलेलेल जग मोरे यांनी आपल्या कथेत रंगवले. मोटारड्रायव्हर क्लिनर, वेल्डर, मेहतर, वेश्या त्यांचे दु:ख त्यांचे समस्या कथेच्या विषय झाले. ‘चित्राक’ हा कथासंग्रहात थोडा भडकपणा व उत्तापणा त्यात जाणवतो.

भाष्कर चंदनशिव यांना दु:खत भावना जवळची वाटते. जीवनातील वेगवेगळ्या अवस्थांचे ते चित्रण करतात. ग्रामीण भाषा आणि प्रतिमा वापरून पात्रांच्या मनात खोल उतरण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात दिसते.

नागनाथ कोतापल्ले यांनी ग्रामीण अनुभवाबरोबर त्यांना इतर विषयही तितक्याचे तिव्रतेने मांडले आहे.

औद्योगिक संस्कृती नवी जीवनपद्धती रंगनाथ पठारे त्यांच्या कथेत आलेली आहे. अर्धशहरी, अर्धग्रामीण अशा तालुक्यासारखी लहान गाव त्यांच्या चिंतनाचा विषय बनतात. ‘सटाणा ते सटाणा’ आणि ‘न्युजस्टोरी’ या कथा प्रखरनेने सामाजिक भाष्य करणाऱ्या आहेत. जीवनविषयक सुंदरस्वप्न मनाशी बाळगुन एक पदविधर नोकरीला येतो. पण परिस्थितीमुळे सर्वतत्व बाजुला ठेवून त्याला तडजोड करावी लागते आणि

स्वत:चे एका बधीर दांभिक प्राध्यावकात रूपांतर करावे लागते. ‘न्युजस्टोरी’ कथा पत्ररूपाने उलगडत जाते.

सदानंद देशमुखांची कथा साधेपणाने साध्या घटना प्रसंगातून उलगडत जाते. तरीही मनाची पकड घेते. ‘अंधारबन’ हा त्यांचा पहिला कथासंग्रह ग्रामीण मनाची कालवाकलव टिपण्याचा प्रयत्न देशमुख करतात. त्यामुळे त्यांची कथा आपोआपच कलात्मकतेच्या पातळीवर पोहचते. ‘उलंगवाडी’ हा कथा तर सुरवातीपासून शेवटपर्यंत नाट्यमय पद्धतीने रेखाटलेली आहे. ग्रामीण बोलीची लयही ते सांभाळतात. ‘लचांड’ हा त्यांचा दुसरा कथासंग्रह त्यातील ‘भोगवटा’ ही कथा खेड्यातून शिकून शहरात गेलेला पण खेड्याची नाळ न तुटलेला अशा मुलाचे चित्रण करते. ‘कडकी’, कुरण, कमाई अशा कथा लक्षात राहतात. सदानंद देशमुखांच्या कथा लेखनाने ग्रामीण कथेच्या आशा पल्लवीत होतात. गावात शाळा, ग्राम पंचायत, बालवाडी, सोसायट्या, यंत्रे, दवाखाना आले पण कथामध्ये रंगवतात. प्रति, प्रतिमा, अलंकृतता यांच्या आहारी न जाता अनुभवाला एका कलात्मक पातळीवर अविष्कृत करण्याचे सदानंद देशमुख यांचे सामर्थ्य एकूण ग्रामीण कथेच्या कक्षा वाढविणारे आहे.

राजन गवस यांच्या कथा देवदासीच्या जीवनावरील वास्तव बाजु मांडतात. या सर्व ग्रामीण कथाकरांचे बालपा खेडयाशी संबंधीत असल्यामुळे खेडयाचे परिवर्तन त्यांनी अनुभवले आणि म्हणूनच प्रखरतेने ते मांडू शकले.

वासुदेव मुलाटे यांनी मोजक्याचे पण उत्कृष्ठ कथा लिहिल्या. ग्रामीण भागातील शोषकांचा वर्ग हा त्यांचा चिंतनाचा विषय. ‘चाचरी’ या कथेत ते प्रामाणिक कष्काळ कोतवालाचे चित्रण करतात. ‘उबड’, ‘कोंडमारा’, ‘ओढ’ ह्या कथा उल्लेखनिय आहे.

गणेश धांगडे यांनी ‘खोपा, ‘सरण’ या कथेत गरीबांच्या मरणापेखाही पैसा श्रेष्ठ कसा असतो याचे चित्रण त्यांच्या कथामध्ये अवतरते व मन लावून टाकते.

ग.ल. ठोकळ, यु. म. पठाण, सुखराम हिवराळे यांनी दर्जेदार उत्तम कथानिर्मीती केलेली आहे.

**समारोप :—**

ग्राम शब्दाचा अर्थ व्यापक आहे. त्यामुळे त्यात सर्वजाती धर्माचा समावेश होतो. म्हणूनच महात्मा गांधी, महात्मा फुले, तुकाराम महाराजांचा वारसा सांगता येतो. ग्रामीण कथेची वैशिष्टये म्हणजे ग्रामीण कथेत नटवेपणा नाही. तिला प्रेक्षाकपणा भडकपणाचा सोस नाही. ग्रामीण कथाकार परिचित जीवनविषयीच लिहितो त्यामुळेच ते ह्रदयाला भिडते. ग्रामीण मातीचा गंध अलंकारामुळे ते अनुभव गोचर होतात. ग्रामीण कथा सर्वस्पर्शी सर्वग्रामी आहे. ग्रामीण कथेने ग्रामीण मुलुख जिवंत केला. जीवनाचे सुक्ष्माती सुक्ष्म स्पंदने ग्रामीण कथा रंगवते. आजपर्यंत अनुलक्षित राहिलेला समाज त्यांच्या जीवनपद्धती तेथील माणूस कथेत उतरला तो वाचकाला भावला हे ग्रामीण कथेचे मोठेपणा आहे.

आज जागतिकीरणाच्या बदलत्या काळात प्रत्येक शहरी माणसाच्या मनात एक गाव दबलेला आहे. ज्या मातीवर तो पोसला तो तिच्यावर जीवापाड प्रेम करतो. गाव सोडून शहरात आलो आणि माणसाच्या गर्दीत मिसळला याची त्याला खंत आहे. ह्या भावभावना ग्रामीण कथाकाराने आपल्या कथेत उतरवल्या. त्यामुळे ग्रामीण माणसाचा न्युनगंड कमी झाला याचा आत्मीक वाढला. ग्रामीण कथेने महाराष्ट्र सांस्कृतिक वाङ्‌मयीन सामाजिक प्रबोधन घडवून आणले आहे. कोणत्याही लेखकाला त्याच्या समाजापासून दूर करता येत नाही. तो समाजच त्याला लिहीता बोलता करीत असतो. ग्रामीण कथेत असाच कथाकार उतरला.

**निष्कर्ष :—**

- कथा हा जनमानसावर प्रभाव टाकणारा स्वतंत्र वाङ्‌मय प्रकार आहे.
- कथा या वाङ्‌मय प्रकाराचे लेखन विश्व मोठे, विविधांगी, विस्तारलेल आहे.
- दलित कथेने तळागाळातील समुदायांच्या वेदना त्यांच्या जीवन जाणीवा प्रभावीपणे मांडल्या आहेत.
- ग्रामीण कथेने ग्रामीण जीवनाच्या जीवन जाणीवा, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घटविले आहे.
- दलित कथेने दलितांच्या, उपेक्षितांच्यस, वंचितांच्या संघर्षाला नवी वाचा फोडली आहे.

- दलित ग्रामीण कथेमुळे प्रकाशझोतात नसलेली प्रतिभा प्रकाशमान झाली.
- दलित आणि ग्रामीण कथेनी कथा या वाङ्:मय प्रकाराला आणि एकूणच संपूर्ण साहित्य

  विश्वाला विशाल आणि समृद्ध केले.
- दलित आणि ग्रामीणर कथा एक सामाजिक परिवर्तनाची चळवळ म्हणून साहित्यातून प्रतिबिंबीत होऊ लागली.

**संदर्भग्रंथ सूची :—**

*मराठी कथा स्वरुप आणि आस्वाद — प्रा. दा. वि. कुलकर्णी*
*मराठी वाङ्:मयातील नवीन प्रवाह — शरणकुमार लिंबाळे*
*कथा संकल्पना आणि समिक्षा — सुधा जोशी*
*मराठी कथा चर्चा आणि चिकित्सा — सं. प्रा. शैलेष त्रिभूवन*
*लघु कथा तंत्र आणि मंत्र — ना. सि. फडके*
*मराठी साहित्य प्रवाह आणि प्रवृत्ती — डॉ. प्रकाश खरात*
*दलित साहित्याचा इतिहास — डॉ. म. खु. पगारे*
*दलित साहित्य वेदना आणि विद्रोह — भालचंद्र फडके*
*नव वाङ्:मयातील प्रवृत्ती व ध्येय — प्रा. रा. ग. जाधव*